# महाराष्ट्र टाइम्स



www.maharashtratimes.com

नोंदणी क्र. एमएएच/एमआर/साउथ-१३/२००६-०८. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. १२४९/ ६२.

मुंबई, बुधवार १० डिसेंबर २००८ ◆ पाने १४ ◆ शहर आवृत्ती ** ◆ रुपये २.५०


# सत्तरीची 'कृत्रिम गर्भधारणा' डॉक्टरांना अमान्य

## डॉ. हृषिकेश पै म्हणतात, ही तर शरमेची बाब

**आशा कबरे-मटाले**

सत्तरीच्या महिलेला 'आयव्हीएफ'च्या साह्याने प्रेग्नंट करण्यात मोठेपणा नसून उलट त्या डॉक्टरच्या दृष्टीने ही शरमेची गोष्ट आहे. त्यांनी तिचाच जीव धोक्यात घातलेला नाही तर त्या मुलाच्या नशिबी काही वर्षांत 'अनाथ' होणे लिहिले आहे, अशी तीव्र नाराजी डॉ. हृषिकेश पै यांनी हरयाणातील घटनेबद्दल व्यक्त केली. डॉ. पै हे लिलावती हॉस्पिटलमधील 'इन्फर्टिलिटी स्पेशलिस्ट' आहेत.

हरयाणातील सत्तरीतील दाम्पत्याला 'आयव्हीएफ'मुळे अपत्यप्राप्ती झाल्याचे नुकतेच प्रसिद्ध झाले. संबंधित स्त्रीची मासिक पाळी बंद होऊनही २० वर्षे झाली होती. ब्रिटन-अमेरिकेत 'आयव्हीएफ' वापरताना माता-पित्याच्या वयाची बेरीज ११० पेक्षा अधिक नसावी, असा अलिखित दंडक आहे. आपल्याकडच्या आगामी 'सरोगसी विधेयका'त (असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह टेक्नॉलॉजी रेग्युलेशन बिल) आयव्हीएफसाठी वयाची कमाल मर्यादा ५५ इतकी नमूद करण्यात आल्याचे डॉ. पै सांगतात. मात्र, हे विधेयक फक्त 'सरोगेट माते'च्या कमाल वयाचा उल्लेख करते. आयव्हीएफसाठीच्या कमाल वयाबद्दल विधेयकात स्पष्ट उल्लेख नाही व अशाच मुद्द्यांमुळे विधेयकावर चर्चेची गरज आहे, असे दिल्लीतील 'समा' संघटनेच्या सरोजिनी एन. बी. सांगतात.

काही दिवसांपूर्वी मुंबईतील एका डॉक्टरने 'गे' जोडप्याला 'सरोगसी'ने अपत्यप्राप्ती करून दिली. त्याबद्दल डॉ. पै म्हणतात— 'तंत्रज्ञानाचा वापर कुणासाठी करावा याबद्दल डॉक्टरांनी तारतम्य बाळगण्याची गरज आहे. समलिंगी संबंधांना विरोध नाही. पण समलिंगी जोडप्याकरिता 'आयव्हीएफ'चा वापर आपण करणार नाही. उद्या ते मूल या कृतीबद्दल मला कोर्टातही खेचू शकते, असेही ते म्हणतात.' कुठल्याही कारणामुळे एवढा धोका पत्करणे अयोग्यच. त्यामुळे यावर बंदीच हवी, असे मत 'फॉग्सी'चे नियोजित अध्यक्ष डॉ. संजय गुप्ते यांनीही व्यक्त केले.



### ती माझी चूकच!

डॉ. पै यांनी काही वर्षांपूर्वी ६० वर्षांच्या महिलेला 'आयव्हीएफ'च्या साह्याने गर्भधारणा घडवली होती. 'मात्र ती आपली चूक होती. त्या महिलेच्या दबावाखाली येऊन आपण तसे केले, पण तशी चूक पुन्हा केली नाही' अशी कबुलीही डॉ. पै यांनी दिली.